# धार्मिक समानतेची स्पष्ट सुनावणी



मृदुला सावंत
zeemarathidisha@dnaindia.net
समुपदेशक



'शबरीमला येथील मंदिरात महिलांनाही प्रवेश : सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचे मत' या बातमीने लक्ष वेधून घेतले. गेल्या एक-दोन वर्षांत निरनिराळ्या प्रसिद्ध मंदिरांमध्ये महिलांचा प्रवेश हा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. शनी-शिंगणापूरसारख्या ठिकाणी तर न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करत मंदिरप्रवेश करणाऱ्या महिलांशी गावकऱ्यांनी हिंसक वर्तणूक केल्याचीही उदाहरणे आहेत. अर्थात यात समाधानाची गोष्ट ही आहे की प्रत्येक वेळी न्यायालयाने घटनेशी सुसंगत अशीच भूमिका घेतलेली आहे.

बातमीत उल्लेख केलेल्या शबरीमला येथील अय्यप्पामंदिरात १० ते ५० वर्षे वयोगटातील महिलांना प्रवेश करण्यास बंदी आहे. ही बंदी केरळ सरकारच्या हिंदू सार्वजनिक पूजास्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) नियम १९६५ ( Hindu places of public worship authorisation & entry rules १९६५) मधील नियम ३(ब) नुसार घालण्यात आलेली आहे. या बंदीला आव्हान देणाऱ्या याचिका सुनावणीसाठी आल्या असताना पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने स्वागतार्ह भूमिका घेतली आहे. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान काही महत्त्वाचे मुद्दे घटनापीठाने मांडले आहेत, ते आपण समजून घ्यायला हवे.

'जिथे जिथे पुरुष जाऊ शकतात, तिथे तिथे महिलाही जाऊ शकतात' असे स्पष्ट प्रतिपादन घटनापीठाचे प्रमुख न्यायाधीश दीपक मिश्रा यांनी केले. त्याचबरोबर स्त्रियांचा प्रार्थना/पूजा करण्याचा अधिकार हा घटनादत्त आहे, घटनेने त्यांना दिलेला तो मूलभूत अधिकार आहे, तो कोणत्याही कायद्यावर अवलंबून नाही असेही त्यांनी सांगितले. याचाच अर्थ असा की केरळ सरकारने सार्वजनिक पूजास्थळांवरील स्त्रियांच्या प्रवेशावर बंदी घालणारा जो अधिनियम लागू केला आहे, तो घटनेशी विसंगत आहे. यासंदर्भात आपली भूमिका अधिक स्पष्ट करताना न्यायालयाने म्हटले की कोणताही नियम अथवा कायदा हा वैध आणि घटनेशी सुसंगत (legitimate & constitutional ) असणे आवश्यक आहे.

या सुनावणीदरम्यान मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी यासंदर्भात घटनेतील मूलभूत अधिकारांपैकी कलम १४, १५ व १७ यांचा उल्लेख करून सदर बंदी ही या कलमांमध्ये नमूद केलेल्या अधिकारांची पायमल्ली असल्याची भूमिका मांडली आहे. ही कलमे नेमके काय सांगतात, ते बघुया. कलम १४ 'कायद्यासमोर समानता' हा अधिकार अधोरेखित करते आणि कायद्यासमोर धर्म, वंश, जात, लिंग, जन्माचे ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही गोष्टीवर आधारित भेदभावाला प्रतिबंध करते. कलम १५ (१,२) हे कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, जन्माचे ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव भेदभावाची वागणूक देण्यापासून सरकारला प्रतिबंधित करते. तर कलम १७ अस्पृश्यता निर्मूलनाचा अंगीकार करून ही रूढी कोणत्याही प्रकारे चालू ठेवण्यास प्रतिबंध करते.

या कलमांच्या अनुषंगाने महिलांना प्रवेशबंदीबाबत इंदिरा जयसिंग यांनी असे म्हटले आहे, की शरीरशास्त्राच्या (Physiology ) आधारावर करण्यात आलेला हा भेदभाव फक्त स्त्रियांच्या बाबतीत करण्यात आला आहे. कारण १०-५० म्हणजेच साधारणतः रजोदर्शन होणाऱ्या महिलांवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळेच हा लिंगाधारित भेदभाव असून समानतेचे तत्त्व पायदळी तुडवणारे आहे. तसेच, ही बंदी सरकारकडून घालण्यात आलेली असल्यामुळे सरकारकडून स्त्रियांना लिंगाधारित भेदभावाची वागणूक दिल्याचे स्पष्ट होते, जे कलम १५ नुसार प्रतिबंधित आहे. तसेच, अस्पृश्यता निर्मूलनाबाबत भाष्य करणारे कलम १७ हेही इथे लागू पडते, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

एकंदरीत शबरीमला येथील मंदिरात मुलींच्या प्रवेशावर घालण्यात आलेल्या बंदीला घटनेचा कोणताही आधार नसून अशी बंदी उठवून महिलांना मंदिरात प्रवेश करण्याची मुभा दिली पाहिजे, अशी निःसंदिग्ध भूमिका न्यायालयाने घेतली आणि ही अतिशय सकारात्मक बाब आहे.

अर्थात या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी, की मंदिरात प्रवेश करण्याची मुभा मिळणे हे धार्मिक समानता मिळवण्याच्या मार्गातील फक्त पहिले पाऊल आहे. खऱ्या अर्थाने सर्व संधींची समानता मिळणे किंवा धर्मसत्तेमध्ये सहभागाची संधी मिळणे हे आपले उद्दिष्ट असणे आवश्यक आहे.

या बातमीचा विचार करताना एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतो, तो म्हणजे प्रत्येक बाबतीत बदल घडवून आणण्यासाठी जनतेला न्यायालयाकडे धाव घेण्याची गरज का भासावी? न्यायालयाचे काम जनतेवरील अन्याय दूर करण्याचे असले तरी ते प्रामुख्याने गुन्ह्यांच्या संदर्भात असायला हवे. आपल्या रोजच्या सामाजिक आणि धार्मिक बाबतीत बदल हे खरे तर न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय करायला हवेत. सामाजिक आणि धार्मिक बाबतीत बोलायचे झाले तर आपल्या देशातील पद्धती, रूढी, नियम हे जुन्या काळापासून चालत आलेले आहेत. ज्यावेळी हे नियम घडले, त्यावेळी समाजाची मानसिकता आणि धर्माची चौकट जशी होती तशी ती आज नाही. आजूबाजूची परिस्थितीही प्रचंड प्रमाणात बदलली आहे. असे असताना त्यावेळच्या रूढीपरंपरांमध्ये परिस्थितीनुरूप अनुकूल बदल घडवून आणायची जबाबदारी खरे तर धर्ममार्तंडांनी घ्यायला हवी आणि धर्माच्या अनुयायांनीही घ्यायला हवी.

समाज आणि धर्म या दोहोंवरही एकमेकांचा प्रभाव पडत असतो. पूर्वीपासून आपल्या समाजात पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्यामुळे त्यावेळी स्त्रियांच्या उत्पादनाची, पुनरुत्पादनाची व लैंगिकतेवर पुरुषाचे संपूर्ण नियंत्रण असे. रजोदर्शन होत असलेल्या स्त्रियांना दैनंदिन व्यवहारातून

> सामाजिक आणि धार्मिक बाबतीत बदल हे खरे तर न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय करायला हवेत. प्रत्येक बदलाची जबाबदारी न्यायालयावर टाकणे योग्य नाही.

बाजूला काढणे हा या नियंत्रणाचाच भाग होता. मात्र त्याला धर्माची जोड देण्यात आली आणि या काळात स्त्री अपवित्र असते हा समज पसरवण्यात आला. आजही हा समज समाजात खोलवर रुजलेला आहे. यामागचे शास्त्रीय सत्य समजून हा समज दूर करणे अतिशय आवश्यक आहे. आता कालानुरूप पुरुषप्रधानतेचा विळखा थोडा सैल झाला आहे. त्यामुळेच लिंगभाव समानता (gender equality) यासारख्या गोष्टींचा स्वीकार केला जाऊ लागला आहे. या बदलाचे प्रतिबिंब धर्मांमध्येही पडणे अपेक्षित आहे.

'धारयति सः धर्मः' म्हणजे 'जो धारण करतो तो धर्म' असे म्हटले जाते. म्हणजेच काय तर जो नवनवीन गोष्टी धारण करतो, स्वीकारतो तो धर्म! त्यामुळेच धर्मात सांगितलेल्या गोष्टी पुन्हा पुन्हा तपासून त्या कालसापेक्ष व कालानुरूप आहेत की नाहीत, ते पाहणे आणि आवश्यक तिथे त्यात योग्य ते बदल करणे, हे प्रत्येक धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीचे काम आहे. आणि प्रत्येक धर्मातील तज्ज्ञांची ती जबाबदारी आहे. त्यामुळेच प्रत्येक बदलाची जबाबदारी न्यायालयावर टाकणे योग्य नाही!